# Kerala Tourism

## MAHARASHTRA TIMES

### God Land Kerala

**Date :** 29.7.2022 | **Edition :** Pune | **Page :** 6 | **Clip size (cm) : W:** 9 **H:** 10

PDF

Clip 1

Image Text

# देवभूमी केरळ

एखाद्या राज्याला पर्यटनाच्या दृष्टीनं कुठली गोष्ट उजवी ठरवते? अर्थातच, त्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या आणि वैविध्य. प्रवास करण्यामागे व्यक्तीनिहाय विविध कारणं असतात. जसे, की कल्चरल किंवा स्पिरिच्युअल, ॲडव्हेंचर किंवा एंटरटेन्मेंट, रिलॅक्ससेशन किंवा एक्सप्लोरेशन इत्यादी. एखादं राज्य या सर्वच 'ट्रॅव्हल इंटरेस्ट'ची पूर्तता करत असेल, तर पर्यटनाच्या दृष्टीनं ते उजवं ठरतं. 'आयडियल डेस्टिनेशन'ची ही व्याख्या केरळ सर्वार्थानं पूर्ण करतं.

**कन्याकुमारी**

कन्याकुमारी म्हणजे भारताचं दक्षिण टोक. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंद महासागर एकत्र येणारं जगातील एकमेव ठिकाण. देव-देवतांच्या मंदिरांबरोबरच विवेकानंद रॉक आणि तिरुवालूवर या तमिळ संतांचा पुतळा ही स्थलदर्शनंही आहेत.

**त्रिवेंद्रम्**

त्रिवेंद्रम किंवा तिरुअनंतपुरम् म्हणजे केरळची राजधानी. स्वातंत्र्यपूर्व काळात दक्षिणेकडचं महत्त्वाचं ठाणं होतं. आजही 'कोलोनिअल चार्म' टिकवून आहे. संपत्तीचं आगार असलेलं 'पद्मनाभस्वामी' मंदिर इथून जवळच आहे.

**अलेप्पी**

बॅकवॉटर ही केरळची खासियत. त्यातल्या हाउस बोट्स आणि बाजूला नारळीच्या रांगा! हे चित्र आहे, पश्चिम किनाऱ्याजवळच्या 'अलेप्पी'चं. बोटींमधून बॅकवॉटरची सैर केल्याशिवाय केरळ सहल पूर्णच होत नाही.

**ठेक्कडी**

केरळच्या सहलीत 'वाइल्ड लाइफ'चा अनुभव पेरियार नदीजवळ वसलेलं ठेक्कडी देतं! पेरियार ही केरळमधली महत्त्वाची नदी. किनाऱ्यावर वसलेलं जंगल म्हणजे 'पेरियार वाइल्डलाइफ सेंच्युरी.' बोटीतून ही सफारी अनुभवता येते.

**मुन्नार**

मुन्नार म्हणजे 'भूमियील स्वर्गम्' अर्थात 'पृथ्वीवरील स्वर्ग.' चहा आणि कॉफी मळ्यातून, डोंगर-कड्यांमधून जाणारा विलोभनीय रस्ता पाहिला, की गंतव्य स्थळापेक्षा प्रवासच अधिक सुंदर वाटतो. धुकं, गुलाबी थंडी आणि मधूनच पाऊस अशा वातावरणात मुन्नारच्या सौंदर्याला चार चाँद लागतात.

दोन वर्षांनंतर केरळ आपल्या स्वागताला पुनःश्च सज्ज झालं आहे. मिनी केरळ आणि पूर्ण केरळच्या अनेक तारखांसह नेहमीप्रमाणे आम्ही घेऊन आलो आहोत, ऑल इन्क्लुसिव्ह आणि आकर्षक पॅकेज! लिमिटेड सीट्स असल्यामुळे बुकिंग लवकर करा.